REVIEW OF RESEARCH

IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# सत्यशोधक समाज - एक पर्यायी मार्ग



**प्रा. दिगंबर शिवाजी वाघमारे**
**इतिहास विभाग , विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभुर्णी**
**ता. माढा, जि. सोलापूर.**

## प्रास्ताविक :–

म. फुल्याचे कार्य समाजक्रांतिकारकाचे आहे. कालबाह्य झालेल्या जुनाट मुल्यांवर त्यांनी सतत कठोर प्रहार केले. धर्म आणि समाज यांची नवरचना करून माणसाची मूलभूत प्रतिष्ठा प्रस्थापित व्हावी, यासाठी फुल्यांनी आमरण लढा दिला. सामाजिक आणि धार्मिक स्वरूपाचे सारे अधिकार मूठभर उच्चवर्णीयांच्या हातात एकवटलेले असल्यामुळे सर्वसामान्य मनुष्य त्यापासून वंचित झालेला होता. कनिष्ठ स्तरांतील शेतकरी कष्टकऱ्यांना आणि शुद्रातिशुद्रांना अज्ञानामुळे आपल्यावर होणाऱ्या अन्यायांची पुरेशी जाणीवही नव्हती. त्यांचे अनेकांगी शोषण धर्माच्या व ईश्वराच्या नावाखाली शतकानुशतके होत होते. म. फुल्यांना या परिस्थितीची जाणीव तीव्रतेने झाल्यामुळे एका नव्या प्रगत समतावादी समाजरचनेसाठी ते बलदंडपणे झगडत राहिले. माणसाच्या पायातल्या गुलामगिरीच्या बेड्या तोडून तो मुक्त व्हावा आणि त्यांचे मनुष्यपण सर्वार्थानी विकसित व्हावे ही फुल्यांची भूमिका होती. माणसाच्या शोषणाला जुन्या शास्त्रपुराणांची एक तात्विक बैठक होती. ती उखडून टाकण्यासाठी फुले प्रयतनशील होते. वस्तुत: फुल्याचे सारे जीवन सत्य, स्वातंत्र्य, समता आणि मानवी प्रतिष्ठा या तत्वांच्या प्रतिष्ठापनेसाठी झगडण्यातच व्यतीत झाले आहे. समाजपरिवर्तनासाठी त्यांनी जे नानाविध स्वरूपाचे कार्य केले त्यांचे समग्रदर्शन त्यांनी स्थापना केलेल्या सत्यशोधक समाजात घडते सत्यशोधक चळवळ म्हणजे सामाजिक दास्यामध्ये अनेक वर्षे दडपल्या गेलेल्या दलितांचा पहिला प्रतिकाराचा आवाज होता. जातीव्यवस्थेखाली दबलेल्या मानवाचा तो एक उत्कट उद्गार होता. अनेक वर्षे साध्या माणुसकीलाही पारख्या झ ालेल्या दीन-दुबळ्या जीवांच्या भावनांचा तो एक उद्रेक होता.[१] सत्यशोधक चळवळ ही काही शाश्वत मुल्यांवर आधारली होती. मानवतावाद, बुध्दिप्रामाण्यवाद, व्यक्तिस्वातंत्र्य या थोर मानवी मुल्यांची जोपासना या चळवळीने केली. मानव तेवढा एक त्याच्यातील जातिभेद, धर्मभेद, राष्ट्रभेद किंवा खंडभेद हे खोटे आहेत. यावर जोतिरावांचा अभंग विश्वास होता. मनुष्याच्या जन्माने त्यांचे श्रेष्ठत्व किंवा नीचत्व ठरत नाही. कारण जन्मत: सर्व माणसे सारखीच असतात लिंगभेदावर आधारलेली. माणसांमधील विषमतेत देखील अन्याय आहे. स्त्री आणि पुरूष हे समान पातळीवर आहेत. पुरूष आणि स्त्री यांच्यामध्ये भेद करणे हे महान असत्य आहे. याबाबत ते आपल्या सार्वजनिक सत्यधर्म मध्ये म्हणत. आपल्या सर्वाच्या निर्माणकत्याने एकंदर सर्व स्त्रियांस अगर पुरूषांस एकंदर सर्व मानवी हक्कसंबंधी आपले पाहिजेत तसे विचार, आपली पाहिजे तशी मते बोलून दाखविण्यास, लिहिण्यास आणि प्रसिध्द करण्यास स्वतंत्रता दिली आहे. स्त्री अथवा पुरूष जे एकंदर सर्व गावाच्या, प्रांतांच्या, देशांच्या व खंडाच्या संबंधाने अथवा कोणत्याही धर्मातील मताच्या संबंधाने कोणत्याच प्रकारची आवडनिवड न करता या सर्व स्त्रीपुरूषांनी या भुगोलावर आपले एक कुटुंब समजून, एकमताने, एकमेकांशी सत्यवर्तन करून वागावे इतकेच काय, एकाच घरात बौध्दधर्मी बायको, ख्रिस्तधर्मी नवरा इस्लामधर्मी कन्या व सार्वजनिक सत्यधर्मी पुत्र यांना प्रेमाने नांदायला लावील तोच खरा धर्म[२] भारतातील प्रबोधन कालखंडात सत्याशोधक चळवळीने प्रभावी पर्यायी विचार दिला. माणसामध्ये कोणताही भेद सत्यशोधक चळवळ मान्य करत नसे सत्यशोधक चळवळीचे क्रांतिकारी तत्वज्ञान समाजपरिवर्तनाची नांदीच ठरले.

## सत्यशोधक समाजाचे तत्वज्ञान :-

निर्मिकाच्या संदर्भात सर्व माणसे समान आहेत धर्मग्रंथाचे ईश्वरी प्रामाण्य सोडून देऊन ज्या ग्रंथमध्ये समता आहे असा ग्रंथ मग तो कोणत्याही देशातील असो व ज्याचा सर्वाना सारखा उपयोग घेता येतो. असा ग्रंथ मनुष्यनिर्मित मानावा असे पाहिले सुत्र जोतिरावांनी मांडले, मात्र कोणत्याही धर्माचा धर्मग्रंथ प्रमाण धरा असे त्यांनी सांगितले नाही. दास्य व अस्पृश्य मानण्याची जी कारणे होती ती दूर केल्यानंतर ज्याने ती दूर केली तो आपल्याच कुटुंबातील आहे असे समजून सत्यशोधकाने त्यांच्याशी वर्तन करावे असा भावार्थ जोतिरावांनी जाहीर केला. सत्यशोधक चळवळीची प्रमुख पाच तत्वे खालीलप्रमाणे आहेत.

१) जातिव्यवस्था नष्ट व्हावी.
२) चातुर्वर्ण्या व्यवस्था नाहीशी व्हावी.
३) सर्वाना शिक्षण मिळावे.
४) अंधश्रध्दा नाहीशा व्हाव्यात.
५) शेतकरी व कष्टकरी यांचे शोषण थांबावे.[३]

समाजप्रबोधनाच्या काळात नव्या बुध्दिजीवी मध्यमवर्गीयांना व्यापक भूमिका घेता आली नाही. परंतु सत्यशोधक चळवळीने समग्र समाजपरिवर्तनाची व्यापक भूमिका घेवून समाजातील स्त्रीदास्यअंतक लढा प्रभावीपणे उभा केला. शेतकरी कष्टकरी समाजाचे प्रश्न पहिल्यांदाच हाताळले शेतकऱ्याच्या दुहेरी शोषणव्यवस्थेला उघड केले. ब्रिटिश सरकारकडून ज्या पध्दतीने शेतकऱ्यांचे शोषण होत होते. त्याचप्रमाणे ब्रिटिशप्रशासन व्यवस्थेमध्ये सेवेत असणाऱ्या देशी उच्चभुकडून शेतकऱ्यांचे शोषण होत असे. शेतकऱ्यांना शोषणाची जाणीव करून देवून त्यांच्यामध्ये लढावू वृत्ती सत्यशोधक समाजाने निर्माण केली. अस्पृश्यांच्या दु:खांना वाचा फोडली सत्यशोधकांचे तत्वज्ञान अतिशय क्रांतिकारी होते यातूनच महाराष्ट्रात समाजप्रबोधनाची कृतिशील परंपरा निर्माण होते. आजच्या काळात ही जातियता, शेतकऱ्यांचे शोषण व दुरावस्था हे प्रश्न कायम आहेत. त्यामुळे सत्यशोधकांचे तत्वज्ञान अधिक उपयुक्त व कालसुसंगत वाटते.

### सत्यशोधक समाजची विशिष्ट उदिष्टे :-

ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इत्यादिक लोकांच्या दास्यत्वापासून शुद्र लोकांना मुक्त करण्याकरिता व आपल्या मतलबी ग्रंथाच्या आधारे आज हजारो वर्षे ते शुद्र लोकांस नीच मानून गफलतीने लुटित आहे आहेत. यास्तव समुपदेश व विद्याव्दारे त्यांस त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरिता म्हणजे धर्म व व्यवहारासंबंधी ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथांपासून त्यांस मुक्त करण्याकरिता काही सुज्ञ शुद्र मंडळींनी हा समाज ता. २४ सप्टेंबर सन १८७३ इसवी रोजी स्थापन केला. या समाजात राजकीय विषयावर बोलणे अतिबात वर्ज्य आहे.[४] सत्यशोधक समाज हा प्राचीन काळापासून प्रभावी असणाऱ्या मतलबी धर्मग्रंथांना प्रखर विरोध करतो. हजारो वर्षापासून शुद्रातीशुद्रांचे कशी फसवणूक केली जात होती हे उघड करतो. सत्यशोधक समाजाचे उदिष्टे म्हणजे शोषणविरहीत दास्यमुक्त समतेवर आधारित मानव समाज बनविण्याचे होते. सामाजिक समता हाच लोकशाहीचा मुख्य गाभा आहे. जन्माधिष्ठित जाति व्यवस्थेवर आधारलेली लोकशाही या देशात खऱ्या अर्थाने नांदू शकत नाही. लोकशाहीच्या विकासासाठी आपणांस जातिव्यवस्था शक्य तितक्या लवकर नष्ट केली पाहिजे हा विचार महात्मा फुले यांचा होता. महात्मा फुले ब्राम्हणेतर समाजाला सुज्ञ बनवू इच्छित होते. त्याच प्रमाणे त्यांमध्ये असणाऱ्या अनेक खुल्या कल्पना त्यांना नष्ट करावयाच्या होत्या. प्रचलीत काळात प्रार्थना समाज कार्यरत असताना ही सत्यशोधक समाज स्थापन का करण्यात आला याबद्दल माधवराव बागल लिहितात, प्रार्थना समाजासारखा प्रगमनशील व उदारमतवादी संस्थेचा सभासद होवुन जोतीरावांना आपले कार्य करता आले असते की नाही ? असा प्रश्न कित्येकाकडून करण्यात येतो. प्रार्थना समाजाचे एक प्रमुख कार्यकर्ते ब्राह्मणेतर होते. मग जोतीरावांनी निराळा समाज काढण्याची यातायात का केली ? या प्रश्नाचे उत्तर प्रार्थना समाजाच्या कार्यक्षेत्राचा विचार केला असता आपोआप मिळणारे आहे. प्रार्थना समाजातील बहुतेक सभासद विव्दान होते. त्यांना संस्कृत येत असे त्यांचे वादविवाद प्रार्थना, भाषणे वगैरे उच्च वर्गातील लोकांची प्रौढ प्रगल्भ भाषेत असत. सामान्य जनतेला ते काय समजावयाचे ? विषयही मोठे मोठे असत त्यांचे कार्यक्षेत्र सुशिक्षित तरूण पिढी हे होते. म. जोतीरावांना मागासलेल्या वर्गाचा उध्दार करावयाचा होता. मागासलेल्या वर्गात उत्पन्न झालेले नव्हे दाट माजलेले अज्ञानरूपी जंगल तोडावयाचे होते. त्यांना अडाणी लोकांना समजतील असे विचार त्यांच्या तर्कशास्त्राप्रमाणे त्यांच्या भाषेत मांडावयाचे होते. म्हणूनच सत्याला प्राधान्य देणारा समाज काढावा लागला.[५]

### सत्यशोधक चळवळीचा कार्यक्रम :-

सत्यशोधक चळवळ म्हणजे सामाजिक दास्यामध्ये अनेक वर्षे दडपल्या गेलेल्या दलितांचा पहिला प्रतिकाराचा आवाज होता. जातीव्यवस्थेखाली दबलेल्या मानवाचा तो एक उत्कट उदगार होता. अनेक वर्षे साध्य माणुसकीलाही पारख्या झालेल्या दीनदुबळ्या जीवांच्या अव्यक्त भावनांचा तो एक उद्रेक होता. मानवाच्या समतेवर विश्वास घोषित करणारी आधुनिक महाराष्ट्रातील ही पहिली चळवळ होय. सत्यशोधक चळवळीच्या कार्यक्रमाविषयी मा.प. मगुंडकर लिहितात, मानवतावाद आणि विचारप्रामान्यवाद याचप्रमाणे व्यक्तिप्रामाण्यावर देखील ज्योतिरावांच्या लिखाणामध्ये प्रतिबिंबित झाला आहे. जातीव्यवस्थेखाली दडपला गेलेला माणूस आपली आत्मोन्नती करून घेऊ शकत नाही आणि आत्मविकासाच्या आड येणारी सर्व बंधने आपण दूर लोटली पाहिजेत हे त्यांच्या विचारांचे सार आहे. अमेरिकेमधील गुलामगिरीमध्ये नरकवास भोगत असणाऱ्या निग्रोना दास्यमुक्त करणाऱ्या स्वातंत्र्यवीरांना ज्योतिरावांनी आपले गुलामगिरी पुस्तक मोठ्या भक्तिभावाने अर्पण केले आहे. यामधून त्यांच्या निर्भेळ मानवतावादाचे आणि व्यक्ति स्वातंत्र्याचे सम्यकदर्शन झाल्यावाचून राहत नाही. ज्योतिरावांच्या विचाराचा आशय हा व्यापक मानवतावादी आणि स्वातंत्र्यवादी होता. जातीव्यवस्थेमुळे निर्माण झालेली सामाजिक विषमता नष्ट करणे, देव व भक्त यांच्यामध्ये दलालाची भूमिका वढविणारी भटशाही नष्ट करणे, ब्राह्मणेतर समाजात शिक्षणाचा फैलाव करणे, इंग्रजांशी

सलोखा ठेवून सरकारी यंत्रणेत जास्तीत जास्त जागा मिळविणे, सत्यशोधक चळवळीचे तत्वज्ञान व कार्यक्रम अंशतः त्यांच्या शपथविधीत व्यक्त झालेला आहे. हा शपथविधी असा -

सर्व माणसे ही एक परमेश्वराची लेकरे आहेत. हे सर्व माझे बंधु आहेत आणि या तत्वानुसार मी सदैव आचरण करीन. सत्यशोधक समाजाला कित्येक निष्ठावंत प्रचारक लाभले. कित्येकांनी आपले जीवन त्या कार्यासाठी वाहून घेतले खेडोपाडी फुल्यांचा संदेश व कार्य पसरविण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. अशिक्षित, निरक्षर लोकांच्या मनाला जाऊन भिडण्यासाठी या प्रचारकांनी प्रचाराचे लोक शिक्षणाचे नवे तंत्र शोधून काढले. नवी माध्यमे उपयोगात आणली तमाशे, लावण्या, सवाल-जवाब, किर्तने, गोंधळे, वगैरे प्रकार किंवा त्यांचे कल्पकतेने केलेले अनेकविध मिश्रण, यातून हा प्रचार यशस्वी झाला. सत्यशोधकीजलसे म्हणून हा प्रचार पुढे सुप्रसिध्द झाला असाल, तरी त्याचे मूळ उदिष्ट व प्रयत्न जनमानसाला भिडण्याचा होता. जुन्या लोकप्रिय माध्यमांतून नवा आशय ओतण्याचा नवा संदेश पोचविण्याचा होता.[६] सत्यशोधक समाजाने दैनंदिन जीवनातील मूलभूत गोष्टी आणि त्यातील कर्मकांडे यावरच आपला हल्ला केंद्रित केला त्यांचा सर्वात महत्वाचा कृतीचा कार्यक्रम आपले स्वतःचे धार्मिक विधी स्वतः करणे विशेषतः विवाह समारंभ ब्राह्मण पुरोहितांच्या, विशेषतः ज्यांना जास्त तुच्छतेने भट म्हटले जात असे अशांच्या मदतीशिवाय पार पाडणे हा होता. आणि तसा तो राहिला. सत्यशोधक समाज ही एक परंपरेवर मुळापासून हल्ला करणारी शक्ती होती. बौध्द धर्म आणि भक्ति मार्ग पंथ यासारख्या भारतातील सांस्कृतिक उठावांची आणि पाश्चात्यांकडून येणारी विचारसरणी यांचे मिश्रणकरण्याची त्यांची वृत्ती होती.[७]

महाराष्ट्रातील समाजप्रबोधनकार्यला आधिक व्यापक व गतिमानता सत्यशोधक चळवळीमुळेच आली. भारताचा प्राचीन सांस्कृतिक वारसा परिवर्तनाच्या अनुषंगाने आधिक भक्कम करण्याचे काम सत्यशोधक चळवळीने केले. महात्मा गौतम बुध्द, संततुकाराम यांचे विचार आत्मसात करून शोषण विरहीत समाजाच्या दिशाने पाऊल टाकले.

**संदर्भग्रंथ :-**

१) मुंगडकर मा.प. महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ, गजानन बुकडेपो पुणे पृ.४
२) मुगडकर मा. प. महात्मा मुले आणि सत्यशोधक चळवळ, गजानन बुक डेपो, पुणे पृ.१२
३) विचारे के. व्ही. भरातीय सत्यशोधक समाज घटना.
४) मंगुडकर मा.प. महात्मा मुले आणि सत्यशोधक चळवळ, गजानन बुक डेपो, पुणे पृ.१०
५) सत्यशोधक हरिक महोत्सव ग्रंथ १९३३ पृ ३७
६) वैध प्रभाकर, म. फुले आणि परंपरा पृ ८८
७) ऑमवेट गेल, वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड पृ १२३